# ५,७८२ लाभार्थ्यांना मिळाले रमाई आवास घरकुल

नागपूर, ता. ९ : जिल्ह्यातील तब्बल ५ हजार ७८२ कुटुंबांना रमाई घरकुल मिळाले आहेत. या योजनेंतर्गत ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना त्यांच्या स्वतःच्या जागेवर अथवा कच्च्या घराच्या ठिकाणी ३०० चौरस फुट जागेवर घर बांधण्याकरिता १ लाख २० हजार रुपयांचे अनुदान दिले जाते.

जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकतील गरीब कुटुंबांचे घरकुलाचे स्वप्न साकार करता यावे, यासाठी जिल्हास्तरीय समिती प्रयत्नशील आहे. सर्वाधिक म्हणजेच ५ हजार ७८२ दलित कुटुंबाना घरकुल देऊ शकलो, याचा अधिक आनंद आहे, असे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

ज्या लाभार्थ्यांच्या प्रस्तावास जिल्हास्तरीय समितीद्वारा मंजुरी प्राप्त झालेली आहे, अशांना घरकुल मंजूर झाल्याच्या सूचना पंचायत समितीद्वारे दिल्या जात आहेत. सदर योजनेंतर्गत ज्या लाभार्थ्यांनी अद्यापही अर्ज सादर केले नाहीत, अशांना घरकुल मिळण्याकरिता संबंधित ग्रामपंचायतीमध्ये अर्ज सादर करता येतील. संबंधित पंचायत समितीने परिपूर्ण भरलेले व आवश्यक दस्तावेज असलेले अर्ज सादर करावेत, असे आवाहन सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी केले आहे.

## तालुकानिहाय लाभार्थी

कळमेश्वर - ४८५, भिवापूर- ४७२, पारशिवनी- ६३५, कुही - ६७७, हिंगणा - १४६, नरखेड - ५३९, काटोल - ६२५, मौदा - ४६३, कामठी - १३२, सावनेर --४३९, रामटेक- ४९७, नागपूर ग्रामीण -२४५, उमरेड - ४२७